केंद्र शासनाकडून "राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य, २०२६-२७" या योजनेच्या भाग-१ अंतर्गत कृषि विभागास प्राप्त झालेला निधी कृषि विद्यापीठांना वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय, क्रमांक: कृषिवि-३७२६/प्र.क्र.१३३/ई-१८१३३०३/७-अे
कृषि विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१/०८/२०२६

संदर्भ:-

१) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक: F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७/CAPEX, दि.२७/०३/२०२६.
२) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मंजूरी पत्र क्रमांक: F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७/CAPEX-Maharashtra (E File No-३००७८५२४४), दि.२९/०७/२०२५.
३) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.३७/अर्थबळ, दि.१४/०५/२०२६.
४) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४६/अर्थबळ, दि.०९/०७/२०२६.
५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.३८/अर्थबळ, दि.०९/०७/२०२६.
६) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२२/अर्थबळ, दि.०३/०८/२०२६.
७) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२२/अर्थबळ, दि.०४/०८/२०२६.

प्रस्तावना:-

केंद्र शासनाच्या "राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य" या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसाठी ५० वर्षांच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरुपात विशेष आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येत आहे. यासंदर्भात केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने संदर्भ क्र.१ येथील दि.२७.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये उक्त योजनेची मार्गदर्शक तत्वे विहीत केली आहेत.

केंद्र शासनाच्या "राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना, २०२६-२७" अंतर्गत केंद्र शासनाने दि.२९.०७.२०२६ च्या आदेशान्वये भाग-१ च्या प्रस्तावांना मंजूरी देऊन, दि.२९.०७.२०२६ च्या आदेशान्वये यापैकी ६६ टक्के रकमेचा पहिला हप्ता म्हणून, भाग-१ साठी निधी वितरीत केला आहे. भाग-१ अंतर्गत सास्की (SASCI) योजनेअंतर्गत कृषि विद्यापीठे/महाविद्यालये यांचे बांधकाम व इतर बांधकामे यासाठी (सोबत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्पांची यादी

जोडली आहे.) केंद्र शासनाने वितरीत केलेल्या पहिल्या हप्त्यापोटी कृषि विभागासाठी मंजूर झालेला एकूण रु.८३,२७,८८,०००/- (अक्षरी रुपये त्र्याऐंशी कोटी, सत्तावीस लक्ष, अठ्ठयाऐंशी हजार फक्त) इतका निधी कृषि विद्यापीठातील संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्यास वित्त विभागाच्या संदर्भ क्र.६ व ७ येथील शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने सदरचा निधी कृषि विद्यापीठांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

केंद्र शासनाच्या, राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य २०२६-२७ या योजनेच्या भाग-१ अंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या निधीनुसार पहिल्या हप्त्यापोटी एकूण **रु.८३,२७,८८,०००/- (अक्षरी रुपये त्र्याऐंशी कोटी, सत्तावीस लक्ष, अठ्ठयाऐंशी हजार फक्त)** इतका निधी चालू वित्तीय वर्षामध्ये खर्च करण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणांना/कृषि विद्यापीठांना खालीलप्रमाणे प्रकल्पनिहाय वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

(रु.कोटी)

अ. क्र.	केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रस्तावाची रक्कम	भाग-१ अंतर्गत पहिल्या हप्त्याचा निधी	तपशीलवार लेखाशिर्ष	विद्यापीठ	प्रकल्पाचे नाव	वितरीत करावयाचा निधी
१	२	३	४	५	६	७
१	१२६.१८	८३.२७८८	मागणी क्र.जी-८, ४४१५, कृषि विषयक संशोधन आणि शिक्षण यावरील भांडवली खर्च, ८० सर्वसाधारण, ०५१ बांधकामे, (०१) केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत ५० वर्षांसाठी बिनव्याजी कर्ज, (०१) (०१) सास्की (SASCI) योजनेअंतर्गत कृषि भवन, कृषि विद्यापीठे/ महाविद्यालये व इतर बांधकामे (कार्यक्रम), ५३, मोठी बांधकामे, संगणक सांकेतांक क्रमांक ४४१५ ०२२५	महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी	महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय,हाळगांव येथील सभागृहाचे बांधकाम करणे.	४.००
२					महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत ऊस संशोधन केंद्र पाडेगाव, ता.फलटण, जि.सातारा येथे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे.	७.००
३					महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत ऊस संशोधन केंद्र पाडेगाव, ता.फलटण, जि.सातारा येथे शेतकरी प्रशिक्षण केंद्र तथा अतिथीगृहाचे बांधकाम करणे.	८.१७
४					महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथे देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे बळकटीकरण करणे (टप्पा-१)	१२.००

५					महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथे विद्यार्थी वसतिगृहाचे बांधकाम करणे.	३.१५८८
६					महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, धुळे येथे विद्यार्थी वसतिगृहाचे बांधकाम करणे.	३.००
७					महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे विद्यार्थी वसतिगृहाचे बांधकाम करणे.	३.००
८					महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मध्यवर्ती परिसर, राहुरी येथे विद्यार्थी वसतिगृहाचे बांधकाम करणे.	३.००
९					महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि तंत्र विद्यालय, मांजरी, पुणे व कुरण डेअरी फार्म, मांजरी, पुणे येथील प्रक्षेत्रावरील विविध बांधकाम करणे.	३.००
१०					महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथील सर्व्हे नं.४८, ५७/१ व सर्व्हे नं.५९, ६० आणि ६२ येथील प्रक्षेत्रासाठी संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे.	३.००
११				डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली	डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला-रोहा, जि.रायगङ या संस्थेचे बांधकाम करणे.	२.००
१२					डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत दिवेआगर, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील सुपारी संशोधन केंद्र (विस्तार) या केंद्राचे बळकटीकरण करणे.	५.००
१३				डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला	डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत आंतरराष्ट्रीय कृषि सुविधा केंद्राचे बांधकाम करणे.	२६.९५
	१२६.१८	८३.३७८८				८३.३७८८

२. उपरोक्त वितरीत रक्कम वरील तक्त्यामधील रकाना क्रमांक ४ येथील लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर तरतुदीमधून खर्ची घालण्यात याव्यात.

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीकरिता वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ३, ४ व ५ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

४. केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.१ येथील दिनांक २७.०३.२०२६ च्या पत्रातील मार्गदर्शक सूचना विचारात घेवून निधी खर्च करावा. तसेच, केंद्र शासनाने व राज्य शासनाच्या वित्त विभागाने यासंदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

५. सदर शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेला निधी PFMS प्रणालीद्वारे आहरीत करण्याबाबतची योग्य ती कार्यवाही कृषि विद्यापीठांनी करावी.

६. या आदेशान्वये वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने ज्या प्रकल्पांसाठी मंजूर केला आहे, त्याच प्रकल्पांसाठी व त्यातील प्रयोजनासाठीच खर्च करावा.

७. केंद्र शासनाकडून विशेष अर्थसहाय्य योजनेंतर्गत सन २०२६-२७ करिता राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी मंजूर झालेली बिनव्याजी रक्कम दिनांक ३१ मार्च, २०२७ पूर्वी खर्च करणे बंधनकारक आहे.

८. केंद्र शासनाकडून दुसऱ्या हप्त्याचा निधी प्राप्त करुन घेण्यासाठी वरील तक्त्यामधील रकाना क्रमांक ३ मधील रकमेच्या किमान ७५ टक्के इतक्या रकमेच्या खर्चाचे प्रमाणपत्र, केंद्र शासनाच्या GFR १२B या नमुन्यात दि.०२.०९.२०२६ पर्यंत विभागास सादर करावे. मात्र उर्वरित सर्व निधी दिनांक ३१ मार्च, २०२७ पर्यंत पूर्णपणे खर्च करणे बंधनकारक राहील.

९. केंद्र शासनाकडून प्राप्त निधी कोषागारातून काढून संबंधित अंतिम लाभार्थ्यांना प्रदान केल्यानंतरच तो खर्च म्हणून गृहीत धरण्यात येईल. कोषागारातून काढलेला निधी अन्य खात्यात साठवून ठेवण्याची परवानगी नाही, ही बाब विचारात घ्यावी.

१०. केंद्र शासनाकडून प्राप्त निधी खर्च करताना संबंधित प्रकल्पांवर त्याच बाबीसाठी केंद्र किंवा राज्य शासनाच्या अन्य निधीमधून किंवा राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२६-२७ मध्ये अन्य भागात प्राप्त झालेल्या निधीमधून दुबार निधी प्रदान केला जाणार नाही याची दक्षता सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी घेणे आवश्यक आहे.

११. केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली खर्चासाठी विशेष सहाय्य योजनेच्या भाग-१ अंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या निधी संदर्भात अंमलबजावणी यंत्रणा यांनी महालेखापाल यांनी विहित केलेल्या नमुन्यात लेखे ठेवावेत.

१२. सदर शासन निर्णयातील निधी वितरण प्रकल्पांसाठी कुलसचिव (संबंधित विद्यापीठ) यांना “समन्वय अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या योजनेसाठी विद्यापीठास वितरीत केलेल्या निधीच्या खर्चाचे व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात समन्वय करावा.

१३. सदर शासन निर्णय वित्त विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२२/अर्थबळ, दि.०४.०८.२०२६ अन्वये प्राप्त सूचनेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२११९२९५३५३४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf Dept, 2.5.4.20=B693D975FFFC642FE6B87C2CE9E1297FD1E8BDA9B459F85F75F159984BA680FD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.08.21 19:31:01 +05'30'

(प्रतिभा पाटील)

उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
३. मा.सभापती/उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
४. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय,मुंबई.
५. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण), यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई.
६. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व अल्पसंख्यांक), यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई.
७. मा.मंत्री (कृषि), मंत्रालय,मुंबई.
८. मा.राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय,मुंबई.
९. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
१०. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
११. सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
१२. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
१४. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१५. सचिव, कृषि विभाग,मंत्रालय, मुंबई.
१६. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
१७. वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
१८. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/विद्यापीठ अभियंता,महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहिल्यानगर.
१९. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता,डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला.
२०. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई.
२२. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२३. जिल्हा कोषागार अधिकारी, अहिल्यानगर/रत्नागिरी/अकोला.
२४. उपकोषागार अधिकारी, राहुरी/दापोली/अकोला.
२५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२६. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.

२७. उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.

२८. उप सचिव/सह सचिव, वित्त विभाग (व्यय-१ /अर्थसंकल्प /अर्थबळ/ऋण व हमी), मंत्रालय,मुंबई.

२९. उप सचिव, कार्यासन २-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

३०. कार्यासन ७-अे (निवडनस्ती), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.